## संक्षिप्त फौजदारी खटला क्र.३०३/२०१६ निशाणी २४ लगत सरतपास

फिर्यादीने आपल्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात पुराव्यात कागद दाखल करण्याबाबतचे कथन केलेले आहे. आरोपीचे वकील हजर आहेत. युक्तीवाद ऐकला.

सबब खालील आदेश करण्यात येतो –

९. या कामी निशाणी ४/१ च्या यादीसोबत फिर्यादीने धनादेश सादर केलेला आहे. त्या धनादेशावरील आरोपीची सही त्याने ओळखली आहे व तो त्यांच्या कारखान्याला दिला असल्याचे सांगितले आहे. (**सदर धनादेशाला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियम १८८१ चे कलम ११८ व १३९ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.३१ देण्यात येते**.) निशाणी ४/२ येथे धनादेश अनादरीत झाल्यामुळे बँक ऑफ इंडिया या बँकेचा मूळ मेमो सादर केला आहे. (**सदर मेमोला परक्राम्य दस्ताऐवज अधिनियमचे कलम १४६ अन्वये गृहीतक असल्यामुळे त्याला निशाणी क्र.३२ देण्यात येते.)** निशाणी ४/३ कडे मेमोसोबत आलेले बँकेचे पत्र सादर केले आहे. त्यावर बँक अधिका–यांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (**सदर पत्राला निशाणी क्र.३३ देण्यात येते.)**

**१०.** निशाणी ४/४ येथे आरोपीला कारखान्याच्या वकीलांमार्फत दिलेली नोटीस हजर केलेली असून त्याच्यावरील सही साक्षीदाराने ओळखलेली आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. (**सदर नोटीसला निशाणी क्र.३४ देण्यात येते.)** निशाणी ४/५ येथे आरोपीला पाठविलेल्या नोटीसची पोहोचपावती दाखल केली आहे. त्यावर पोस्टाचा शेरा आहे. **(त्यास निशाणी क्र.३५ देण्यात येते.)**

**११.** त्यानंतर प्रस्तुत साक्षीदाराला कामकाज चालविण्यासाठी संचालक मंडळाचा अधिकार दिल्या बाबतचा ठराव निशाणी क्र.४/६ वर दाखल केला

आहे. त्या ठरावावर कारखान्याच्या अधिका–यांची सही आहे. ती साक्षीदाराने ओळखलेली आहे. **(सबब ठरावाला निशाणी क्र.३६ देण्यात येत आहे.)**

**आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब**

VINAYAK DATTATRAY PATIL

Digitally signed by VINAYAK DATTATRAY PATIL
Date: 2023.03.09 11:27:08 +0530

आटपाडी (वि. द. पाटील)

दिनांक : ०८/०३/२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, आटपाडी